क्रमांक : ६७०५ /क-१.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २५ मार्च, २०२३.

संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१७४१/क-१, दिनांक १७ जानेवारी, २०२३
२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.४२२५/क-१, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३
३) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.६३८३/क-१, दिनांक २३ मार्च, २०२३

:: **कार्यालयीन आदेश** ::

शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी समाप्त होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन कालावधीत या सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या अतिरिक्त कामाचा विचार करुन, या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांना सोमवार, दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी सुट्टी देण्यात येत आहे.

संदर्भ क्र.(१) अन्वये हिंदूहृदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या तैलचित्राच्या समारंभाच्या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीकरीता रविवार, दि.२२ जानेवारी, २०२३ रोजी कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र.(२) व संदर्भ क्र.(३) अन्वये अधिवेशनाच्या कामकाजाकरिता अनुक्रमे रविवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ व शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. या दिवशी कार्यालयात उपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना उक्त तीन दिवसांच्या तीन बदली रजा दिनांक **३१ डिसेंबर, २०२३** पर्यंत वरिष्ठांच्या पूर्व परवानगीने उपभोगता येईल.

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

..२/-

५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
८) कक्ष अधिकारी, "ह" कक्ष (विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि रेल्वे कुपन वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती व निवृत्तीवेतन), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१०) सर्व समिती प्रमुख यांची कार्यालये.
११) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
१३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.
१४) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१५) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) उप सचिव (श्री.रा.म.तारवी), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सुट्टीच्या दिवशी सदस्यांच्या प्रवास भत्त्यांची देयके व रेल्वे कूपन्स देण्याची व्यवस्था करावी.
२) सर्व मंत्रालयीन विभाग.
३) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
४) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**टिप :-**

**सोमवार, दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी कार्यालयीन कामकाजाकरिता कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या "क-३"(लेखा) कक्ष, "क-४" (अर्थसंकल्प) कक्ष, "ग-१" (सामान्य) कक्ष, "ग-२" (सामुग्री) कक्ष व "ह" (सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतने) कक्ष या कक्षातील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्या दिवसाची बदली रजा त्यांच्या विनंतीनुसार देय राहील.**